महाराष्ट्र पोलीस

## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ६७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०९/२०१७

**१) महिलेवर अत्याचार करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २५/०९/२०१७ चे २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही घरी एकटीच राहत असुन नमुद घटना ता.वेळी व ठिकानी फिर्यादी ही तिचे घराचे छपरात एकटीच बसलेली असतांना यातील आरोपीने तिच्यावर अत्याचार करून नंतर तिचे तोंडात कापडाचा बोळा टाकुन, गळा दाबुन भिंतीवर डोके आपटुन तिला जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने, फिर्यादीने उपचारा दरम्यान दिलेल्या बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७६,३०७,४५० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील सपोनी. चौधरी. पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**२) नगदी पैशे व सामानाची चोरी :–**

दिनांक २७/०९/२०१७ चे १८.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी कु. मनिषा उदाराम गजभिये वय ३१ वर्ष, रा. आधार योजना प्रभारी पंचायत समिती भंडारा, ही पंचायत समिती कार्यालयात कामकाज करीत असतांना फिर्यादी ही स्टॅर्पलर करीता बाजुच्या कक्षात गेली असता, या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे टेबल वर ठेवलेली पर्स ज्यात नगदी १२,३००/रु एसबीआयचे एटीएम कार्ड, ड्रायव्हीग लायसन्स, फोटो व इतर कागदपत्र चोरून नेल्याने, फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी चाबुकस्वार पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी :–**

दिनांक २७/०९/२०१७ चे १२.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी जखमी रतीराम नामदेव बांते वय ७० वर्ष, रा. सुभाष वार्ड भोजापुर हा आरटीओ ऑफीस मधुन काम आटोपुन त्याचे गावी घराकडे सायकलने जात असता, यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव , वेगाने निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे सायकलला धडक मारून जखमी करण्यास करणीभुत झाल्याने,फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १३४,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी चाबुकस्वार पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४) पाण्यात बुडुन युवकाचा मृत्यु :–**

दिनांक २७/०९/२०१७ चे ०५.४५ वाजता दरम्यान यातील मृतक राहुल पुषोत्तम तलमले वय २५ वर्ष, रा. भेंडाळा ता.जि. पवनी हा वैनगंगा नदीचे पाण्यात मृत अवस्थेत उबळया स्थितीत मिळुन आल्याने, फिर्यादी संजय शामराव कोडेकर वय ५२ वर्ष रा. सोमवारी वार्ड पवनी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी बोरखडे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**५) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक १४/०९/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील मृतक अनमोल हरीदास गेडाम वय ५२ वर्ष रा. हत्तीडोई याने किटक नाशक औषध घेतल्याने त्याला सा.रू. भंडारा येथे भरती करून, पुढील उपचारा करीता नागपुर मेडीकल कॉलेज येथे रेफर केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कगद पत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. पो.शी.गळदे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा गिन्हेपुंजे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

६) **प्रकृती बिघडुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक २७/०९/२०१७ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक अमेश मुकेश मेश्राम वय २८ वर्ष रा. आंबेडकर वार्ड देव्हाडी, हीचे पोटात खुप दुखत असल्याने, फिर्यादीने त्यास औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना येथे नेले असता, तेथील डॉ. ने तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने फिर्यादी सौ. अंबिका मुकेश मेश्राम वय २६ वर्ष रा. आंबेडकर वार्ड देव्हाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास बोहवा सरोदे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

७) **अवैध दारू /जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक २७/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, कारधा, करडी, तुमसर, व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून १४५ लिटर हा.भ. दारू + १०० किलो सडवा मोहा + साहीत्य किंमती १८,३२५/–रु,व १ लिटर ३९० मिली लिटर देशी दारू किंमती ५६० तसेच जुगारातुन किमती १४६४/रु असा एकुण किंमती २०,१७९/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

८) **मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २७/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ११ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११० केसेस करण्यात आले आहे.

**( मपोउपनी प्रणती लांजेवार)**
**महीती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.